माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ४४७/२०२१**

**अपिलार्थी, श्री. नितीन सुरेशराव येरकर,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी,**
शिक्षण विभाग, पंचायत समिती पवनी, ता. पवनी जि. भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी,**
पंचायत समिती पवनी, ता. पवनी जि. भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.१२.२०२२**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : अनुपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.०९.२०२० | १६.०९.२०२० (हस्तांतरीत) ०१.१०.२०२० | २८:०९.२०२० | ०९.११.२०२० |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०८.०९.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १) क्रमांक भंजिप/शिवि/माध्य/३४५४/१९ दि.२४.०९.२०१९ अन्वये आणि मी केलेल्या दि.२६.११.२०१९ रोजीच्या लेखी तक्रारी संदर्भाने ज्या नियमानुसार कार्यवाही केल्या गेली आहे त्या नियमाबाबतची माहिती प्रत. २) उपरोक्त दोन्ही पत्रासंदर्भाने केल्या गेलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती ही तत्संबंधित सर्व दस्ताऐवजासह देण्यात यावी ३) उपरोक्त दोन्ही पत्रासंदर्भाने शिक्षणाधिकारी माध्यमिक व प्राथमिक यांना सादर करण्यात आलेल्या किंवा प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाची व या चौकशी अहवालासह पुराव्या दाखल नियमानुसार जोडण्यात आलेल्या दस्ताऐवजांची प्रत. ४) उपरोक्त दोन्ही पत्रासंदर्भाने तक्रारकर्त्याशी करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराची माहिती प्रत ५) उपरोक्त दोन्ही पत्रान्वये नमूद तक्रारी संदर्भाने कार्यवाही करण्यात व कर्तव्यात कसूर करणा-या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर ज्या नियमानुसार दंडात्मक कार्यवाही होणे क्रमप्राप्त ठरते त्या नियमाची प्रत ६) दि.०१ सप्टेंबर २०१९ ते ३१ जानेवारी २०२० पर्यंतच्या आवक-जावक रजिस्टर मधील नोंदीची प्रत " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (शिक्षण), पं.स. पवनी यांनी दिनांक १६.०९.२०२० रोजी अर्जात मागणी केलेली माहिती अनु.क्र.१ ते ५ या कार्यालयाशी संबंधित नसल्याने ती उपलब्ध नाही. ती माहिती आपल्या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असल्यामुळे कलम ६(३)

अन्वये मुळ अर्ज आपल्या प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे. या अर्जावर कलम ७(१) प्रमाणे उचित कार्यवाही करुन अर्जदारास कळविण्याची कळविण्यात येत आहे, असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. भंडारा यांना कळविण्यात आले आहे व त्याची प्रतिलिपी अपिलार्थी श्री. नितीन सुरेशराव येरकर यांना दिलेली आहे. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस उपलब्ध असलेल्या माहितीकरीता एकूण रुपये ४९२/- शुल्काचा भरणा करण्याबाबत सुचीत केले आहे. तद्पूर्वीच अपिलार्थी यांनी **दिनांक २८.०९.२०२० रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "हेतुत: खोटी व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आलेली आहे" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.११.२०२० रोजी सुनावणी घेवून दिनांक ०९.११.२०२० अन्वये, खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहे.

१. मुद्दे क्रमांक १ ते ५ ची माहिती शिक्षण विभागात (या कार्यालयात) निरंक असल्याने मा. शिक्षणाधिकारी माध्यमिक जि.प. भंडारा यांचेकडे जन माहिती अधिकारी यांनी या कार्यालयाचे पत्र क्रमांक ८०५/२०२० दिनांक १६.०९.२०२० अन्वये मुळ अर्ज हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.
२. मुद्दा क्रमांक ६ ची माहितीबाबत शुल्क फी रुपये ४९२/- अपिलार्थी यांनी भरणा केलेले नाही.
३. अपिलार्थी यांनी अपील करणे व सुनावणी वेळेस हजर न होणे, कार्यालयातील मागणीनुसार माहिती उपलब्ध असलेल्या पृष्ठांची शुल्क फी न भरणे, कार्यालयाचा वेळ वाया घालवणे ही गंभीर स्वरुपाची बाब आहे.
४. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (प्रभारी) शिक्षण विभाग पं.स. पवनी श्री. डी.एच. सोनुले यांनी घेतलेला निर्णय बरोबर आहे. अपिल नाकारण्यात येत आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.०२.२०२१ रोजी** " प्रथम अपिलीय अधिका-यांकडून हेतुत: चुकीचा व अवैध असा निर्णय देण्यात आला " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०६.१२.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, श्री. शरदचंद्र योगेश्वर शर्मा उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१.१०.२०२० रोजी मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती प्रदान करण्याकरीता एकूण ४९२/- रुपये शुल्क भरणा करण्याबाबत अपिलार्थी यांना सुचीत केले असता, अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.११.२०२० रोजी सुनावणी आयोजित केली. सदर सुनावणीत माहितीबाबतचा सविस्तर ऊहापोह करण्यात आलेला आहे. त्यात मुद्दा क्र. १ ते ६ ची माहिती मिळणेबाबत अर्ज केलेले होते. परंतू सदर मुद्दे सोडुन या विषयांशी विसंगत अपील अर्जात मांडलेले आहे. त्यात १५० पेक्षा अधिक शब्द नसावेत परंतू अपील अर्जात

४०० चे वर शब्द आहेत, असे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाशी सहमती दर्शवून अपील निकाली काढले आहे.

सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६.०९.२०२० व दिनांक ०१.१०.२०२० रोजी दिलेला प्रतिसाद तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९.११.२०२० रोजी पारीत केलेले आदेश तसेच दिनांक १३.०२.२०२० रोजी अपिलार्थीस पाठविण्यात आलेले पत्र या सर्वांचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व पारीत केलेले आदेश माहितीचा अधिकार कायद्याशी सुसंगत असून अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यास स्वारस्य असल्यास योग्य त्या प्राधिकरणाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच यात माहिती प्राप्त करुन घ्यावयाची असल्यास जन माहिती अधिकारी यांनी सुचीत केल्याप्रमाणे शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★

ठिकाण : नागपूर
दिनांक : ०६.१२.२०२२

जावक क्रमांक ३६४८२ ---- दिनांक 12 JUN 2023